
# 'मटेरियल सायन्स'ची संशोधनात विज्ञानभरारी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

संशोधनामध्ये शिवाजी विद्यापीठाला अव्वलस्थानी आणण्यात मटेरियल सायन्सअंतर्गत येणाऱ्या विभागांनी गेल्या दोन दशकांतील कामगिरीने विज्ञानभरारी घेतली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटी रँकिंगअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या मटेरियल सायन्स विभागाचा देशात दहावा क्रमांक घोषित केला आहे. दोन वर्षांपूर्वी करंट सायन्सच्या यादीतही मटेरियल सायन्समधील संशोधनांनी बाजी मारली होती. भाभा सेंटरसोबत मटेरियल सायन्स विभागाचे काम सुरू असून त्यातूनही संशोधनात शिवाजी विद्यापीठाची आगेकूच करण्यासाठी मटेरियल सायन्स आपले योगदान देत आहे.



> मटेरियल सायन्स या विभागातील सर्वच संशोधनांची नाळ समाजातील दैनंदिन जीवनातील समस्यांच्या निराकरणाशी जोडलेली आहे. संशोधन हे समाजाला उपयुक्त असले पाहिजे हे संशोधनाचे पहिले तत्व आहे. शिवाजी विद्यापीठाने संशोधनाची संख्या व गुणवत्ता या दोन्ही बाबतीत संतुलन सांभाळल्यामुळेच विद्यापीठाला हा सन्मान मिळाला आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

> शिवाजी विद्यापीठामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व इतर अधिविभागांनी केलेल्या संशोधनास या रँकद्वारे जागतिक मान्यता मिळाल्याचा आनंद आहेच पण ही एक प्रेरणा आहे. आजपर्यंत सौर ऊर्जेवर आधारीत उपकरणे, ऊर्जा साठवणूक करण्यासाठी लागणारी यंत्रणा, विषारी वायूंचे प्रमाण तपासण्यासाठी आवश्यक घटक, नॅनो मटेरियल व नॅनो कोटींग या विषयांचा संशोधनात समावेश केला आहे.
>
> – डॉ. पी. एस. पाटील, विभागप्रमुख, पदार्थविज्ञान विभाग

उच्च शिक्षणाचा प्रवाह संशोधनाकडे गेल्यास त्यातून भविष्यातील संशोधक घडतील या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने गेल्या दहा वर्षांत संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भरीव योजना सुरू केल्या आहेत. पदार्थविज्ञान या विभागांतर्गत व विभागप्रमुख डॉ. पी.एस. पाटील यांच्या नेतृत्वाखाली भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र अभियांत्रिकी, पदार्थविज्ञान व खगोल, संगणकशास्त्र, मटेरिअल सायन्स, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, रासायनिक अभियांत्रिकी, ऊर्जा, फार्माकोलॉजी, टॉक्सिकॉलॉजी अॅन्ड फार्मास्युटिक्स, कृषी व जैवविज्ञान, बायोकेमिस्ट्री, जेनेटिक्स अॅन्ड मॉलेक्युलर बायोलॉजी, पर्यावरणशास्त्र, भूशास्त्र, इम्युनॉलॉजी व सूक्ष्मजीवशास्त्र, कला व मानव्यविद्या, आरोग्यविज्ञान, न्युरोसायन्स, नर्सिंग, मानसशास्त्र आणि सामाजिक शास्त्रे यांच्या माध्यमातून संशोधनाचा वेगळा आलेख उंचावण्याचे काम सुरू आहे.

देशातील आघाडीच्या ७० संशोधन संस्थांच्या यादीत १९ वे, तर अकृषी विद्यापीठांत देशात सहावे स्थान प्राप्त करण्यात शिवाजी विद्यापीठातील

## शिवाजी विद्यापीठात समाजोपयोगी संशोधन

मटेरियल सायन्स या विषयातील संशोधनाचा मोठा वाटा आहे. विशेष म्हणजे मटेरियल सायन्सच्या संशोधनात आघाडीच्या २५ संस्थांमध्ये चौथे, तर अकृषी विद्यापीठांत अग्रस्थान प्राप्त केले आहे. संशोधनाच्या बाबतीतही शिवाजी विद्यापीठाचे राज्यातील अग्रस्थान या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. 'करन्ट सायन्स' या जागतिक आघाडीच्या विज्ञान पत्रिकेत ही क्रमवारी जाहीर झाली आहे. मटेरियल सायन्समध्ये होणारे संशोधन हे समाजोपयोगी असल्याचा फायदा विद्यापीठाला क्रमवारीत अव्वल स्थान देण्यासाठी कारणीभूत ठरत आहे.

'करन्ट सायन्स' च्या १० ऑगस्ट २०१६ च्या अंकात 'मॅपिंग एक्सलन्स अॅन्ड डायव्हर्सिटी ऑफ रिसर्च परफॉर्मन्स इन इंडिया' हा विशेष लेख प्रकाशित झाला आहे. ज्या संशोधन संस्थांमधून २२ महत्त्वाच्या विषयांचे ५०० हून अधिक शोधनिबंध, रिव्ह्यू अथवा कॉन्फरन्स पेपर प्रकाशित झाले आहेत, अशा संस्थांचा विचार या क्रमवारीसाठी करण्यात आला. या २२ विषयांमध्ये शिवाजी विद्यापीठातील मटेरियल सायन्स संशोधनासाठी सहभाग दिलेल्या विभागांचा समावेश आहे.

मटेरियल सायन्समधील संशोधनांच्या आधारे कौन्सिल ऑफ सायंटिफिक अॅन्ड इंडस्ट्रीयल रिसर्च, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स आणि इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स या तीन संस्थांनी या क्रमवारीत अनुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळविले आहेत. या यादीत स्थान मिळविणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे. विद्यापीठाने या विषयातील ५६८ शोधनिबंध प्रकाशित केले असून विद्यापीठाचा बेस्ट पेपर रेट २२.५ इतका सर्वोच्च आहे.

# लोकशाही प्रणालीत बदल करण्याची गरज

## डॉ.सुखदेव थोरात : शिवाजी विद्यापीठात तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद




कोल्हापूर : समजाशास्त्र विभागाच्या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राजकीय लोकशाही ही आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीवर अवलंबून असते. समाजामधील गरिबांनाही लोकशाही प्रणालीमध्ये भाग घेण्यासाठी सध्याच्या प्रणालीमध्ये योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. परदेशांमध्ये असे बदल अवलंबले जात आहेत, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोग व भारतीय सामाजिक शास्त्र संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागामार्फत अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सव वर्षाचे औचित्य साधून रशियन सोशिओलॉजिकल सोसायटी, साऊथ आफ्रिकन सोशिओलॉजिकल सोसायटी, एशिया क्लायमेंट चेंज एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरिया, इंटरनॅशनल सोशिऑलॉजीकल सोसायटी आणि इंडियन सोशिऑलॉजीकल सोसायटी यांच्या सहकार्याने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या विषयावर तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. थोरात बोलत होते. अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समाजाच्या प्रगतीमध्ये भरीव योगदान देण्यासाठी शैक्षणिक संस्थांना, अध्यापन आणि संशोधनाच्या माध्यमातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. याप्रसंगी ज्येष्ठ संशोधक व मानवी हक्क कार्यकर्त्या डॉ. गेल ऑम्वेट, भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा डॉ. आर. इंदिरा आणि भारती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तत्पूर्वी, परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ संशोधक प्रा. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. परिषदेचे संचालक व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. पतीक्षा मांगलेकर यांनी सूत्रसंचालन केले.

या परिषदेमध्ये माजी कुलगुरू डॉ. विद्युत जोशी, डॉ. हरी बाबू, हेमिक्सा राव, के. एल. शर्मा, डॉ. परमजित सिंग, डॉ. विजय खरे, डॉ. बी. के. नागला यांचेसह इंडोनेशिया येथील डॉ.अहमद दिरवण, युफी डरनी, स्विझर्लॅण्डमधील जॅडे ग्रेस आणि चार्ले टर्नर, फिलिपाईन्समधील अर्जेल मसंदा, साऊथ कोरियामधील जॉग, दक्षिण अफ्रिका येथील जयंथन गावेंडर, किरण ओढाव आणि सायमन मॅपर्डाइंग, भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सचिव डी.आर. साहू, कुलसचिव विलास नांदवडेकर, सामाजिकशास्त्र शाखेच्या अधिष्ठाता भारती पाटील, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता पी. एस.पाटील, ज्येष्ठ विचारवंत भारत पाटणकर, माजी विभागप्रमुख एस. एन. पवार, जे. बी.आंबेकर, आर. बी.पाटील आदी उपस्थित होते.